# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०८/२०२५ ( मंगळवार )**

## उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हयात अंमलीपदार्थ (एम.डी) पुरवठा करणाऱ्या पाहीजे आरोपीला पोलीसांनी घेतले ताब्यात, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १२/०८/२०२५ रोजी उमरेड पोलीस स्टेशन येथे अरोपी **क्रं १. नामे प्रज्वल लिलाधर माथने,वय २१ वर्षे रा. मेंढा ता भिवापुर, जि. नागपुर, क्रं २. नामे योगेश फुलचंद पवार ,वय २८ वर्षे रा. मेंढा ता भिवापुर, जि. नागपुर क्रं ३. नामे अद्वैत वसंता हेडाउ,वय ३२ वर्षे रा. शिवनगर उमरेड, जि. नागपुर क्रं ४. नामे निखील अरूण कुहीकर ,वय ३१ वर्षे रा. परसोडी, वाघमारे ले आउट, उमरेड,** यांच्या ताब्यातुन (१) एम.डी. (मेफेड्रॉन ड्रग्ज) सदृष्य पावडरनी भरलेल्या एकुण सहा पारदर्शक प्लॉस्टीक पाउच वजन २.७२ ग्रॅम किंमती १२,०००/— रुपये तसेच वाहनामध्ये (२) लाल कॅप असलेल्या पांढ—या रंगाच्या एकुण ०४ सीरम कीमती ८० /— रुपये, गुन्ह्यात वापरलेले चारचाकी वाहन आणि गुन्हयात वापरलेले स्कार्पिओ ई.एक्स क्र. एम.एच. ३० ए.एफ. ४१७९ वाहन जप्त करून नमुद आरोपीतांवर गुन्हा नोंद करून आरोपीतांना अटक करण्यात आली होती. नमुद चारही आरोपीतांना तपासादरम्यान अंमली पदार्थ कोठुन आणला याबाबत विचारपुस केली असता त्यांनी अंमली पदार्थ पुरवठा करणारे दोन आरोपीतांची माहीत दिली. दोन्ही आरोपीतांचा शोध उमरेड पोलीसांनी सुरू केला. त्यापैकी एक आरोपी नामे **मुज्जफर अली वल्द रमजान अली उर्फ चाचा, वय ४७ वर्षे, रा. हसन बाग, घर क्रं ४३२, चांदनी चौक, मोठया मस्जिद जवळ, नागपुर ,पोलीस स्टेशन नंदनवन** याला उमरेड पोलीसांनी गुप्त बातमीदारांच्या आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी नागपुर येथे त्याच्या घरून ताब्यात घेतले. नमुद आरोपीवर पोलीस स्टेशन नंदनवन येथे सुध्दा एन.डी.पी.एस कायदा तसेच शरिराविरूध्दचे गंभीर गुन्हे दाखल आहे. **नमुद आरोपीला अटकेची प्रकीया सुरू आहे.**

## अंमलीपदार्थ बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १८/०८/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, राजू धर्माजी सलामे, रा. वार्ड नं. ४, बाजारगाव, कोंढाळी ता. काटोल हा वार्ड नं. ४, बाजारगाव, कोंढाळी ता. काटोल येथे त्याचे राहते घरी अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे राजू धर्माजी सलामे, वय ५२ वर्षे, रा. वार्ड नं. ४, बाजारगाव, कोंढाळी ता.काटोल यांच्या घराची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीच्या घरून एका प्लॉस्टिक पिशवीमध्ये उग्र वास असलेला हिरवट ओलसर गांजा मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष २३० ग्रॅम गांजा किंमती २४०० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे राजू धर्माजी सलामे, वय ५२ वर्षे, रा. वार्ड नं. ४, बाजारगाव, कोंढाळी ता. काटोल जि. नागपुर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १८/०८/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, बाजार चौक पटगोवारी ,रामटेक येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन धाड टाकुन आरोपी नामे १. महेश छगन पहाडे, वय ३० वर्ष, रा. माहुली, ता.पारशिवनी, २. संतोष उत्तम भोयर, वय ३२ वर्ष, रा. पटगोवारी, ता.रामटेक, ३. गणेश नामदेव फिरके, वय ४० वर्ष, रा. पटगोवारी,ता. रामटेक, ४. नितेश फुलकराम कवरेती, वय ३२ वर्ष, रा. ह.मु आमडी, ता.रामटेक यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. आरोपीतांच्या ताब्यातुन तसेच घटनास्थळावरून ५२ तास पत्ते , रोख रक्कम १२५०/— रूपये, बजाज कंपनीची दुचाकी क्रमांक एम. एच. ४०डी. बी. ७६८१ आणि एक ॲक्टीवा मोपोड क्रमांक एम

एच ४० सी. बी.३०३८ असा एकुण १,६१,२५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रामटेक उपविभागअंतर्गत पोलीस स्टेशनला घेण्यात आल्या प्रशासकिय अधिकारी, शांतता समिती सदस्य, पत्रकार, गणेश मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील यांच्या संयुक्तरित्या बैठक

**पोलीस स्टेशन रामटेक** :— **दिनांक १८/०८/२०२५** रोजी श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन रामटेक येथे शांतता समिती सदस्य, गणेश मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील, पत्रकार यांची संयुक्तरित्या बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी , पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी रामटेक यांच्या सह इतर प्रशासकीय अधिकारी यांनी उपस्थितांना १) गणेश मंडळांना नगरपरिषद, तहसील कार्यालय स्थानिक प्रशासन यांची धोरणानुसार पूर्वपरवानगी घेणबाबत, गणेश उत्सव मंडळाने मंडळासाठी घेण्यात येणारा विद्युत पुरवठा संबंधित विभागाकडूनच घ्यावा तसेच इलेक्ट्रिकच्या तारांमुळे मुळे शॉर्टसर्किट होणार नाही याबाबत काळजी घ्यावी, डीजेचा वापर करण्यात येऊ नये, गणेश मूर्तीचे विसर्जन हे कृत्रिम तलावातच करण्यात यावे अशाप्रकारे अनेक सूचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीत श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांच्यासह श्री रमेश कोळपे तहसीलदार रामटेक, श्रीमती पूनम कदम तहसीलदार देवलापार, श्री रविंद्र मानकर पोलीस निरीक्षक रामटेक, शांतता समिती सदस्य, पत्रकार, गणेश मंडळाचे अध्यक्ष ,पत्रकार असून उपस्थित होते. तसेच **दिनांक १९/०८/२०२५** रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांच्या उपस्थितीत डीजे वाद्य मालक यांची मीटिंग आयोजित करण्यात आली होती सदर मीटिंगमध्ये डीजे मालक यांना मार्गदर्शन करून ध्वनी प्रदूषण कायदा ची माहीती देवुन सूचना देण्यात आल्या.

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— पोलीस स्टेशन पारशिवणी येथे **दिनांक १८/०८/२०२५** श्री राजेशकुमार थोरात थोरात, प्रभारी अधिकारी पारशिवणी यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे

आगामी सणोत्सव निमित्त्य तालुका प्रशासन, शांतता समिती सदस्य, गणेश उत्सव आयोजक/मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील, पोळा आयोजक यांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये श्री सुभाष जाधव, गटविकास अधिकारी पंचायत समिती पारशिवनी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ पारशिवनी चे प्रतिनिधी, नगरपंचायत पारशिवनी चे प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग पारशिवनी चे प्रतिनिधी हजर होते. उपस्थितांना मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या.





# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६३६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६३६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३४ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी अशा एकुण ५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण ११६ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३५ आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**










# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १८/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १९/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली.तसेच पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत कन्हान शहरात धरमनगर, संताजी नगर, अशोक नगर, विवेकानंद नगर, खदान क्रं ३, गहु हिवरा चौक येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये कन्हान पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अधिकारी अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने